कोरोना २०२०/आदेश/क्रमांक ७५६

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग**
**हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१**

दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email: tahasildargadraigad@gmail.com

**(सामान्य शाखा)** **क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना विषाणू/वृत्तपत्र./२०२० दि.३० /०३/२०२०**

**वाचले:-** १) साथरोग अधिनियम १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम २५.

३) शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०

४) शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०

५) संजय न्यूज एजन्सी यांचेकडील पत्र दि. ३०/०३/२०२०.

६) शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील अधिसूचना क्र. डीएमयु/२०२०/सीआर-९२/डीएम-१ दि.२३/०३/२०२०

---

**आदेश :-**

ज्याअर्थी, शासन,सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र.३ कडील अधिसूचनेद्वारे साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २, ३ व ४ ची अंमलबजावणी राज्यात सदर अधिसूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून सुरु करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला असून, शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र. ३ कडील अधिसूचनेद्वारे करोना विषाणूचा प्रसार रोखण्याकामी **"महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२०"** प्रसिध्द केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.५ कडील पत्रान्वये संजय न्यूज एजन्सी, न्यूज पेपर एजंट अॅन्ड बुक सेलर्स, अलिबाग यांनी अत्यावश्यक सेवेमध्ये समाविष्ट असणाऱ्या वृत्तपत्र वितरण व विक्री करीता व वृत्तपत्र घरपोचसेवा देण्यासाठी परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष घोषीत करण्यात आले आहे.

त्याअर्थी मी, श्रीमती निधी चौधरी, जिल्हाधिकारी रायगड तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड मला प्राप्त झालेल्या अधिकारातून वृत्तपत्र सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने संजय न्यूज एजन्सी व इतर वृत्तपत्र सेवा पुरविणाऱ्यांना सकाळी ११.०० वा. पर्यंत वृत्तपत्र वितरण व विक्री करीता तसेच वृत्तपत्र घरपोचसेवा देण्यासाठी परवानगी देत आहे.

**(निधी चौधरी)**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**तथा**
**जिल्हादंडाधिकारी रायगड**

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी
प्रत :- पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांजकडे माहितीसाठी.
प्रत :- उपविभागीय अधिकारी (अलिबाग) / तहसीलदार अलिबाग यांजकडे माहितीसाठी.
प्रत :- न्यूज एजन्सी, न्यूज पेपर एजंट अॅन्ड बुक सेलर्स, अलिबाग यांना.

**(निधी चौधरी)**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**तथा**
**जिल्हादंडाधिकारी रायगड**

Scanned by CamScanner